दै. देशोन्नती दि. 10.10.25



- मनाठा पोलिसांची कारवाई
- गुटखा विक्रेत्यांचे धाबे दणाणले

# पावणेतीन लाखाचा गुटखा जप्त

देशोन्नती वृत्तसंकलन

**बामणी फाटा :** मनाठा पोलीस ठाणे कार्यक्षेत्रांतर्गत गुटख्याची तस्करी होत असल्याची मनाठा पोलिसांना गुप्त माहिती मिळाली. पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पावणेतीन लाख रुपये किमतीचा गुटखा तामसा मार्गे मनाठ्याहून हिंगोलीकडे जाताना मनाठा परिसरात पोलिसांनी जप्त केला.

या वाहनात दोन लाख ७१ हजार २०० रुपये किंमतीचा पान मसाला, सुगंधीत तंबाखू या नावाचा गुटखा आढळला असून सदर वाहन जप्त केले आहे. तसेच आरोपीला अटकही केली आहे. या प्रकरणी जमादार दत्तात्रेय गिरी यांच्या तक्रारीवरून मनाठा ठाण्यात गुन्हा दाखल केला असून तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक विलास चवळी हे करीत आहेत. (वार्ताहर)

## स्कॉर्पिओ गाढीचा पाठलाग करून अडविले

७ ऑक्टोबर रोजी परिसरातून आरोपी समीरखॉ आयाजखाँ पठाण (२५) रा. तामसा गाडी क्रमांक एम. एच. २६ व्ही १६२१ या वाहनात ७ ऑक्टोबर रोजी गुटखा घेऊन जात होता. तामसा येथून मनाठा मार्गे हिंगोलीकडे जात असताना पोलिसांना माहिती मिळाली लगेच मनाठा पोलीस स्टेशनचे ठाणे प्रमुख विलास चवळी यांच्या मार्गदर्शनाखाली फौजदार उप निरीक्षक सुदर्शन इंगोले, बीट जमादार दत्तात्रेय गिरी, खानपट्टे, वाहन चालक संभाजी नरवाडे यासह आदींनी तरोडा मार्गाने हिंगोलीकडे जाणाऱ्या स्कॉर्पिओ गाडीचा पाठलाग करून वाहन अडविले.